सातारा, गुरुवार, ५ जानेवारी २०२३ सकाळ

# रयतमध्येही मिळणार 'एआय'चे शिक्षण

## शरद पवार; संस्थेतील ५० वर्षांच्या योगदानाबद्दल मानपत्र देऊन गौरव

सातारा, ता. ४ : रयतने शिक्षण सर्वांपर्यंत पोचविण्याचे कार्य केले आहे. रयत आता वेगळ्या वळणावर व उंचीवर आहे. जगातील सर्वात मोठी कंपनी असलेल्या आयबीएम व इतर आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी करार करून आर्टिफिशियल इंटेलिजन्स विषयाचे (कृत्रिम बुद्धिमत्ता) ज्ञान घेण्याची सुविधा रयत उपलब्ध करणार आहे. या शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना जगभरात कुठेही नोकरीची संधी मिळेल, असे रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगितले.

श्री. पवार यांच्या वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन आणि रयतमध्ये गेली पन्नास वर्षे मोलाचे योगदान दिल्याबद्दल आज रयत शिक्षण संस्थेच्या वतीने जिल्हा परिषदेच्या सभागृहात मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. कार्यक्रमास ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, सिंबायोसिसचे डॉ. शा. ब. मुजुमदार, खासदार श्रीनिवास पाटील, पान ४ वर »



सातारा : रयत शिक्षण संस्थेतील पन्नास वर्षांच्या योगदानाबद्दल संस्थेच्या वतीने बुधवारी शरद पवार यांचा मानपत्र देऊन डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. त्या वेळी श्रीनिवास पाटील, डॉ. शा. ब. मुजुमदार, डॉ. अनिल पाटील, दिलीप वळसे- पाटील, रामशेठ ठाकूर, अॅड. भगिरथ शिंदे. (प्रमोद इंगळे : सकाळ छायाचित्रसेवा)

### रामशेठ ठाकूर यांची ५ कोटींची मदत

■ रयत शिक्षण संस्थेच्या 'कमवा व शिका' योजनेचे माजी विद्यार्थी व माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी संस्थेला पाच कोटींची मदत केली. या मदतीचा धनादेश स्वीकारल्यानंतर शरद पवार यांनी संपूर्ण सभागृहाला हात उंचावून धनादेश दाखवीत श्री. ठाकूर यांचे आभार मानले. शरद पवार यांच्या शब्दाला मान देत आता त्यांनी एखादी मदत मागितल्यास रामशेठ कोटही काढून देतील, असे श्रीनिवास पाटील यांनी सांगताच सभागृह हास्यकल्लोळात बुडाले.

रयतमध्येही मिळणार 'एआय'चे शिक्षण

» पान १ वरून

माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार दिलीप वळसे -पाटील, संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील, उपाध्यक्ष अॅड. भगिरथ शिंदे, सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, प्राचार्य राजेंद्र साळुंखे, बीव्हीजीचे हणमंत गायकवाड, आमदार बाळासाहेब पाटील, मकरंद पाटील, शशिकांत शिदे, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

श्री. पवार म्हणाले, "कर्मवीरांनी शिक्षण सर्वांपर्यंत पोचविले. रयत देशातील सर्वात महत्त्वाची संस्था आहे. डॉ. अनिल पाटील यांनी खांद्यावर जबाबदारी घेऊन प्रारंभ केला आहे. आता जगातल्या बदलांची नोंद घेऊन त्याप्रमाणे शिक्षण देण्याची आज आवश्यकता आहे. त्यासाठी आम्ही जगातील सर्वात मोठी कंपनी आयबीएमबरोबर करार करून कृत्रिम बुद्धिमत्तेचे ज्ञान देण्याची सुविधा रयतमध्ये उपलब्ध करणार आहे. त्यासाठी काही कंपन्यांशी करार करणार आहे." कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. माशेलकर म्हणाले, "शरद पवार कसे दूरदृष्टीचे आहेत, हे त्यांच्या गेल्या पन्नास वर्षांतील कार्यावरून कळते. श्री. पवार यांचा माझ्या हस्ते सत्कार होणे हा माझ्या आयुष्यातील सर्वोच्च क्षण आहे. कर्मवीरांनी संस्थेचा वेल लावला तो गगनावर नेण्याचे काम श्री. पवार यांनी केले आहे."

डॉ. मुजुमदार म्हणाले, "शरद पवार यांनी प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. ते एक निराळे रसायन असून, त्यांच्यात आत्मविश्वास, आत्मनिर्भयता आणि आत्मार्पण हे तीन गुण आहेत. त्यामुळे आजपर्यंत कुठेही शरद पवार झुकले नाहीत."

खासदार पाटील म्हणाले, "श्री. पवार हे माझे मित्र आहेत. त्यांचा गौरव होताना मला मोठा अभिमान वाटत आहे. मुलींना शिक्षणाची दारे खुली करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे." कार्याध्यक्ष डॉ. पाटील यांनी श्री. पवार यांनी रयतसाठी दिलेल्या योगदानाची माहिती दिली. आण्णांनी पाहिलेले स्वप्न श्री. पवार यांनी पूर्ण केले आहे, असे त्यांनी सांगितले.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.